पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक १९**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ११/८/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ३५८**

मा.अरविंद शिंदे यांचे दि.३०/७/२०२० चे पत्र.

स्वर्गीय लोकशाहिर आण्णाभाऊ साठेंचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव या गावी झाला. त्यांच्या जन्माला १ ऑगस्ट २०२० रोजी १०० वर्ष पुर्ण होत आहेत. सांगली जिल्ह्यातील वाटेगाव सारख्या छोट्याश्या गावात जन्मलेल्या व अवघे दिड दिवस शाळेत गेलेल्या आण्णाभाऊंनी राज्याच्या साहित्य, कला, सामाजिक, कामगार क्षेत्रात व्यापक स्पृहणीय कामगिरी बजावलेली आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी मराठी भाषेत ३५ कादंब-या, लघुकथा, पटकथा व पोवाडे अशा प्रकारचे साहित्य निर्माण केले. त्यातील काही साहित्य हे अनेक विदेशी व भारतीय अशा ३१ भाषेत प्रकाशित झाले आहे.

साहित्यासोबत स्वातंत्र चळवळीत शाहिरीच्या माध्यमातून इंग्रजांविरूध्द लढा देणारे तसेच संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, मुंबई मधील गिरणी कामगारांच्या न्याय व हक्कासाठी केलेले कार्य व गोवा मुक्ती संग्रामात घेतलेली आग्रही भूमिका अशा अनेक कार्यातून देशासाठी, विशेषतः महाराष्ट्राच्या विकासासाठी अमूल्य योगदान देणारे **'साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे'** यांचे यंदाचे जन्मशताब्दी वर्ष आहे. सबब राज्य शासनाकडून **'साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे'** यांचे जन्मशताब्दी वर्षानिमित्त अनेक कार्यक्रम करण्याचे नियोजित आहेत.

सर्वसामान्याच्या व्यथा, कामगार शेतकरी यांच्या ज्वलंत समस्याना आपल्या अमोघ लेखनी व शाहिरिने वाचा फोडली. जन्मशताब्दीच्या निमित्ताने चालु व पूढील अर्थसंकल्पात आर्थिक नियोजन करुन अण्णाभाऊ साठे जन्मशताब्दी वर्षाच्या अनुषंगाने विविध साहित्य, कला, सामाजिक क्षेत्रात व्यापक कार्यक्रम आयोजित करावेत. आण्णाभाऊंच्या दैदीप्यमान कारकिर्दीची माहिती नवीन पिढीस व्हावी याकरिता युवा वर्गासाठी दिग्गज साहित्यिकांचा सहभाग असणारे साहित्य संमेलन मनपाच्या वतीने आयोजित करावे. सर्व उपक्रम कोविड प्रादुर्भाव संपल्यावर आयोजित करावेत.

**विषय क्र. ३५९**

मा.आबा बागुल यांचे दि.३०/७/२०२० चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या हददीतील झोपडपटटी वसाहतींचे पुर्नवसन करणे याकामी पुणे शहरात अनेक झोपडपटटी पुनर्वसन प्रकल्प करण्यात आले आहेत. हे प्रकल्प करणेसाठी बांधकाम विकसकांना पुणे महानगरपालिकेकडून जुना नियम एस आर – ७ व नवीन नियम एस आर– १३.५ नुसार एकास चौदा प्रमाणे जास्तीत जास्त टीडीआर अदा करण्यात येतो. यापोटी बांधकाम विकसक महानगरपालिकेकडून टीडीआर घेवून झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरणास सदनिका हस्तांतरित करतात. अशा प्रकारे अंदाजे ५ ते ६ हजार सदनिका झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरणाकडे पुणे महानगरपालिकेने निर्माण केलेल्या टीडीआरच्या माध्यमातून हस्तांतरित केलेल्या आहेत. या सदनिकांची अंदाजे किंमत ६०० कोटी रूपये इतकी आहे. वास्तविक पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून निर्माण झालेल्या टीडीआर पोटी असलेल्या सदनिका हया पुणे महापालिकेच्या होणे अपेक्षित होते. यामुळे पुणे महापालिकेचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे.

पुणे शहरात झोपडपटटी पुनर्वसन अंतर्गत झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरणाकडे सदनिका कशा पध्दतीने हस्तांतरित केलेल्या आहेत याची चौकशी करावी. मा.नगरअभियंता व मा.उप आयुक्त मालमत्ता व्यवस्थापन यांच्या संयुक्त विद्यमाने सदर सदनिका पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात घेवून त्याची मालकी पुणे महानगरपालिकेची होणेकामी कार्यवाही करावी. तसेच सदर कार्यवाही पूर्ण होईपर्यंत सदर सदनिकांपोटी अदा केलेला टीडीआर खर्ची करणेची प्रक्रिया स्थगित करावी.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करून त्याचा अहवाल मा.स्थायी समितीपुढे १५ दिवसात सादर करावा.

**विषय क्र. ३६०**

मा.आबा बागुल यांचे दि.३०/७/२०२० चे पत्र.

पुणे पेठ पर्वती स्कीम क्रमांक ३ फायनल प्लॉट क्रमांक ४९९ व ५००अ स्वारगेट येथील २८ हजार चौ. मीटर एवढ्या क्षेत्रात महामेट्रोला (महाराष्ट्र मेट्रो रेल कॉरपरेशन लिमिटेड) मेट्रोस्टेशन करण्यासाठी रेडीरेकनर दराने महामेट्रोला पुण्याची सार्वजनिक वाहतूक सुखकर व्हावी यासाठी महानगरपालिकेने जागा दिली आहे. सार्वजनिक हितासाठी जागा देताना रेडीरेकनर दराने जागा देणे योग्य आहे. परंतु मेट्रोस्टेशन उभारत असताना येथे मल्टी मॉडेल हब व्यावसायिक संकुल देखील महामेट्रो करत आहे. सदर जागेचा वापर महामेट्रोने मेट्रो स्टेशन व्यतिरिक्त मल्टी मॉडेल हब व्यावसायिक संकुल करून नफा मिळवत असेल तर यातून होणाऱ्या वार्षिक उत्पन्नातून ४०-५० टक्के हिस्सा महामेट्रोने पुणे महानगरपालिकेला देणे बंधनकारक केले पाहिजे.

आमच्या माहितीनुसार पुणे शहरात अनेक जागा मेट्रो स्टेशनसाठी देण्यात आल्या आहेत. त्यापैकी तीन ठिकाणी मोक्याच्या जागेत महामेट्रोचा मल्टी मॉडेल हब व्यावसायिक संकुल उभारण्याचा विचार आहे. यासर्व ठिकाणच्या व्यावसायिक संकुल मधून येणाऱ्या उत्पन्नाच्या ४०-५० टक्के हिस्सा महानगरपालिकेला मिळावा. महानगरपालिकेने महामेट्रोला दिलेल्या क्षेत्राचे ताबे पावती केलेली आहे. परंतु करारनामा झालेला नाही. करारनामा करताना सदर जागेचा व्यावसायिक हेतूने वापर केल्यास पुणे महानगरपालिकेला होणाऱ्या वार्षिक नफ्यातून ४०-५० टक्के हिस्सा मिळावा अशी अट घालण्यात यावी किंवा ४०-५० टक्के पार्टनरशिप करावी व स्थायी समिती मार्फत मुख्य सभेत मान्यता घेऊनच करार करावा.

महानगरपालिकेचे नफ्याच्या दृष्टीने कार्य करणे हे उद्दिष्ट नाही. परंतु शहराला मूलभूत सुविधा देत असताना उत्पन्न वाढीसाठी विविध पर्याय शोधणे देखील महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. महानगरपालिका सार्वजनिक हिताच्या वापरासाठी महामेट्रोला हिस्यापोटी ९५० कोटी रुपये देणार आहे. त्यापैकी काही पैशाच्या स्वरूपात व उर्वरित जागेच्या स्वरूपात वळती करण्यात येणार आहे. परंतु सार्वजनिक हेतू सोडून महामेट्रो व्यावसायिक हेतूने येथे मल्टी मॉडेल हब व्यावसायिक संकुल उभारत असेल तर महानगरपालिकेला नफ्यामध्ये ४० - ५० टक्के हिस्सा असणे गरजेचे आहे.

पुणे महानगरपालिकेचे व्यावसायिक प्रकल्प पाहणी करिता महानगरपालिकेने स्वतंत्र कंन्सल्टंट नेमून महानगरपालिकेला जास्तीतजास्त कसा प्रॉफिट मार्जिन मिळेल यासाठी त्याची मदत घ्यावी महामेट्रो मल्टी मॉडेल हबचे प्लॅन पास करताना महानगरपालिकेच्या बांधकाम नियमावलीप्रमाणे चार्जेस भरून घ्यावे. हा प्लॅन सँक्शन करताना महानगरपालिकेचा अधिकार देखील राखून ठेवावा. यातून महानगरपालिकेला उत्पन्नाचा मोठा स्रोत निर्माण होईल. यासाठी आपण भूमिका घेऊन पुणे महानगरपालिकेला महामेट्रोच्या व्यावसायिक संकुलमधील एकूण वार्षिक नफ्याच्या ४०-५० टक्के हिस्सा मिळण्यासाठी करारनाम्यात अट घालावी

**विषय क्र. ३६१**

मा.बापूराव कर्णेगुरुजी यांचे दि. ४/८/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र.३ ड नगररोड क्षेत्रिय कार्यालयातील स.नं. १०३ महात्मा गांधीनगर येरवडा, पुणे ६ येथील रेडझोन (प्रतिबंधित) क्षेत्रातील ११७४ कुटूंबांना अन्नधान्याचे कीट देण्यासाठी आवश्यक ती र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक, बजेट कोड - सीई२०ए१०२/एसए२-५५, प्रभाग क्र. ३ ड कलवड येथील मुख्य रस्त्याचे पुर्व भागातील रस्ते डांबरी करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र.३ ड मधील ११७४ नागरिकांना अन्नधान्याचे ११७४ कीटचे वाटप करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. ३६२**

दि. २०/७/२०२० ते दि. २६/७/२०२० अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण १४ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/२११ दि. ४/८/२०२० ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**विषय क्र. ३६३**

दि. १३/७/२०२० ते दि. १९/७/२०२० अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण १५ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/२१२ दि. ४/८/२०२० ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. ३६४**

कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील सन २०१८-२०१९ मधील पेठ हिंगणे खुर्द (सिंहगड रोड) अे फॉर्म क्रमांक २२३५ या मिळकतीच्या आकारणी प्रकरणांची व तदनुषंगिक कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/६२८ दि.३१/७/२०२० ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ११ सन २०२०-२०२१ चा विचारासाठी.

## सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

**विषय क्र. ३६५**

प्रभाग क्र. ४ खराडी येथील स्मशानभुमी मधील दहन शेडचे उर्वरित काम करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.दर्वेश कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५०,३४,२५०=८६ पेक्षा १३.६९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४३,४५,०६१=९१ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रुपये ६,०४,११०/- पर्यंत अधिक मटेरियल टेस्टिंग चार्जेस र.रुपये ३९,३७७/- अधिक रॉयल्टी चार्जेस र.रुपये २६,८५४/- उपलब्ध तरतुदीपर्यंत टेंडर अटीशर्तीनुसार सिमेंट, स्टील यांना विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करुन काम करुन घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/२०६ दि.४/८/२०२० चे पत्र.

## एकच टेंडर प्रकरणे

**विषय क्र.३६६**

पुणे शहरातील भटकी व मोकाट कुत्री यांची नसबंदी शस्त्रक्रिया करण्यासाठी कुत्रे पकडणेसाठी पुणे मनपाच्या श्वान वाहनांवर कंत्राटी स्वरुपाच्या सेवकांची नियुक्ती करण्यासाठी संस्थेची नेमणूक करणे (बी-१ पध्दतीने) कामी टेंडर्स मागविली असता युनिव्हर्सल ॲनिमल वेलफेअर सोसायटी, हिंगणी, ता.आष्टी, जि. बीड यांचे एकच टेंडर आले (पुर्वगणक र.रु.३६,३८,२५०=७२ पेक्षा ९.०००% अधिक) असल्याने त्यांचेकडून र.रु.३९,६५,६९३=२८५ या रकमेपर्यंत काम करून घेणेस, सदर संस्थेशी करारनामा करण्यास व त्याप्रमाणे बिले अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२०१ दि.३०/७/२०२० चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. ३६७**

अग्निशमन सेवा पुरविणेच्या दरामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे दरवाढ करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अग्निशमन/७१ दि.२०/५/२०२० चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार 1 महिन्यानी करावा असे दि. ७/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३६८**

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील हातगाडी वाल्यावंर कारवाई होते व त्यांना रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार) मा.मुख्य सभा ठराव क्र. ७११ दि.२०/१२/२०१७ अन्वये अतिक्रमण कारवाईत जप्त हातगाडी सोडणेकरिता मान्य झालेले रिमुव्हल चार्जेस रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार) रद्द करुन त्याऐवजी रुपये १,०००/- (रुपये एक हजार) रिमुव्हल चार्जेस आकारुन हातगाडया सोडणेबाबत मा.सौ.सुजाता शेट्टी, मा.सौ.पल्लवी जावळे, मा.सौ.अश्विनी कदम, मा.सौ.वैशाली मराठे, मा.सौ.चाँदबी नदाफ, मा.अविनाश बागवे, मा.श्रीमती लता राजगुरु, मा.सौ.रत्नप्रभा जगताप, मा.सौ.लक्ष्मी दुधाने, मा.सौ.दिपाली धुमाळ, मा.आबा बागुल, मा.सौ.हेमलता मगर, मा.सौ.सुमन पठारे, मा.वनराज आंदेकर, मा.अशोक कांबळे, मा.सौ.नंदा लोणकर, मा.सौ.पुजा कोद्रे, मा.प्रिया गदादे, मा.अजित दरेकर यांचे दि. २०/६/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ३१३ दि. ४/७/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्तयांनी जा.क्र. मआ/अतिक्रमण/१९५ दि.३/८/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार 1 महिन्यानी करावा असे दि. ७/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३६९**

पुणे महानगरपालिकेच्या चाळ विभागाकडील मनपा वसाहतीमध्ये राहणाऱ्या (रस्ता रुंदीकरण, पुरग्रस्त, गवनि पुर्नवसन व प्रकल्पबाधित) बिगर मनपा सदनिकाधारकांचे निवासी घरभाडे/लायसेन्स फी मध्ये भाडेवाढ करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सीएसओ/१३९३ दि.१८/२/२०१९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार 1 महिन्यानी करावा असे दि. ७/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३७०**

सन २०१९-२० च्या पुणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात CE22A680 ह्या अर्थशिर्षका अंतर्गत हज हाऊस बांधणे या कामाची र.रुपये ११७.५० लक्ष तरतूद प्रभाग क्र. २७ कोंढवा खुर्द स.नं. ४७/१ येथील पुणे मनपाच्या ताब्यात असलेल्या ॲमिनिटी स्पेसच्या जागेवर हज हाऊसच्या कामासाठीची तरतूद त्याच जागेवर सिव्हीक कल्चरल ॲण्ड कम्युनिटी सेंटर बांधणे या सद्यस्थितीत चालू असलेल्या कामासाठी वापरणेस मान्यता मिळणेबाबत मा.प्र.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भवन/७३२ दि.१९/११/२०१९ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार 1 महिन्यानी करावा असे दि. ७/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३७१**

पुणे मनपा प्रशासनाने शहरातील बहुतांशी जाहिरातफल्कांना चुकीच्या पद्धतीन परवानगी व नुतनीकरणे दिलेले आहे. सदर परवानगी व नुतनीकरण दिलेले जाहिरातफलक प्रत्यक्षात जागेवर रस्त्यापासून १.५ मी. अंतराच्या आतमध्ये, जमिनीपासून ४० फुटांपेक्षा अधिक उंचीवर, नाले व नदीपात्रात तसेच पदपथ व रस्त्यावर देखील उभे केलेले आहेत. सदरील जाहिरातफलक हे प्रचलित कायद्याचा अनादर करणारे असून नागरिकांच्या जीवाच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक आहेत. सदर बाब संबंधित परवाना व आकाशचिन्ह विभागाचे मा. उपायुक्त, मा. क्षेत्रिय अधिकारी व मा. क्षेत्रिय परवाना निरिक्षक यांना ज्ञात असूनही प्रशासकीय निष्क्रियतेमुळे सदरील जाहिरातफलकांवर प्रत्यक्षात कारवाई होताना दिसत नाही. प्रशासनाने सदरील कायद्याचा अनादर करणा-या व धोकादायक जाहिरातफलकांवर १५ दिवसात कारवाई न केल्यास भविष्यात दुर्घटना घडून निष्पाप नागरिकांचा मृत्यु झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित जाहिरातदार, परवाना व

आकाशचिन्ह विभागाचे मा.उपायुक्त, मा.क्षेत्रिय अधिकारी व मा. क्षेत्रिय परवाना निरीक्षक यांचेवर निश्चित करण्यात यावी याबाबत मा.रफिक शेख व मा.सौ.राजश्री काळे यांचे दि. २६/७/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ६३९ दि. ६/८/२०१९ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी जा.क्र. मआ/परवाना व आकाशचिन्ह/६३८ दि.१४/१०/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ७/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३७२**

पुणे महानगरपालिकेकडून जाहिरात फलक परवानगी व नूतनीकरण दिलेल्या सर्व जाहिरात फलक धारकांकडून परवानगीच्या दिनांकापासून ते आजपर्यंत व्यावसायिक दराने कर आकारणी करण्याबाबत मा.सौ.चाँदबी नदाफ, मा.सौ.राजश्री काळे व मा.सौ.वैशाली मराठे यांचे दि.१६/८/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ९६१ दि. २८/८/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/७८६ दि.६/१२/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ७/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३७३**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.प्रमोद ओसवाल व मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २३९९ दि. २०/३/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६३ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ७/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३७४**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.बाळा ओसवाल व मा.योगेश ससाणे यांचे दि.२७/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १४२३ दि. २८/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६४ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ७/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३७५**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे व मा.मुकारी अलगुडे यांचे दि.१५/९/२०१५ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ११४७ दि. १५/९/२०१५ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६५ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ७/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३७६**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.योगेश ससाणे व मा.बाळा ओसवाल यांचे दि.१४/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१९३ दि. २०/२/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६६ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ७/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३७७**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे, मा.सौ.वैशाली मराठे, मा.अभिजित कदम, मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि. १२/३/२०१३ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २६५४

दि. १९/३/२०१३ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६७ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ७/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३७८**

इमारतीचे साईड फ्रंट मार्जिन जाहिरात फलकांबाबत मा.अविनाश बागवे व मा.प्रिया गदादे यांचे दि.१३/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १३१३ दि. २१/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६८ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला फेरअभिप्राय विचारासाठी.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ७/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३७९**

जाहिरात फलक संदर्भातील सर्व कामे परवाना व आकाशचिन्ह विभागामार्फत करून परवानगी व कारवाईचे सर्व अधिकार परवाना व आकाशचिन्ह विभागाचे प्रमुखांना देण्याबाबत मा.सौ.छाया मारणे यांचे दि. २४/१२/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १९४३ दि. ३१/१२/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/आकाशचिन्ह.पर./१०६० दि.७/२/२०२० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ७/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३८०**

पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्रमांच्या व्यतिरिक्त नागरिक/खाजगी/सरकारी/निमसरकारी संस्था/मंडळे/मा.सभासद/लोकप्रतिनिधी इत्यादीकडून त्यांचे खाजगी कार्यक्रमांसाठी तात्पुरत्या स्वरुपासाठी सजावटीकरीता त्यांचेकडून लेखी मागणी आल्यास कुंडयाचे भाडे व अनामत रक्कम यांचे दरात खालीलप्रमाणे वाढ करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१४१ दि.२९/६/२०२० चे पत्र.

| अ.क्र. | तपशील | प्रचलित दर (र.रु.) | प्रस्तावित दर (र.रु.) |
|---|---|---|---|
| १) | पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत भाडयाने देण्यात येणाऱ्या कुंडयाचे भाडे व अनामत रक्कम | भाडे – र.रु.१/– प्रतिकुंडी<br>अनामत – र.रु. १०/– | भाडे – र.रु.१००/– प्रतिकुंडी/प्रतीदिन<br>अनामत रक्कम र.रु. ३००/– प्रतीकुंडी |

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ७/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३८१**

पुणे महानगरपालिकेच्या उद्यानांचे प्रवेशशुल्कामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबतच्या परिशिष्ठ क्र. १ मधील अ.क्र. १ ते १३ उद्यानांचे सद्य:स्थितीत असलेले प्रचलित प्रवेशशुल्क वाढवून उद्यानांचे प्रवेश शुल्क प्रस्तावित दरांप्रमाणे प्रौढांसाठी र.रु.१०/– व लहान मुलांसाठी र.रु. ५/–, मासिक पास र.रु. २००/– व विदेशी नागरिक र.रु. १००/– दैनंदिन तिकीट या प्रमाणे आकारणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उदयान/१४२ दि.२९/६/२०२० चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. ७/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**संकीर्ण**

**विषय क्र. ३८२**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतूदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणू प्रतिबंधक उपाययोजने अंतर्गत उद्‌भवलेल्या आपत्कालिन परिस्थितीमध्ये पुणे मनपा सणस ग्राउंड बॉईज हॉस्टेल येथे लागण झालेल्या रुग्णांना व संशयीत रुग्णांना पुरविण्यात आलेल्या नाष्टा व दोन वेळचे जेवण पुरविणे या कामी

मे.द अक्षय पात्रा फाउंडेशन यांना र.रुपये ४,७०,१००/- पर्यंत जेवण पुरविणे या कामाचे देयक अदा करणेस मान्यता देण्यात आलेली असून सदरची बाब मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/२०२ दि.४/८/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ३८३**

पुणे महानगरपालिका झोन क्र. १ अंतर्गत ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत स्थापित केलेल्या आयसोलेशन/CCC केंद्रामध्ये दररोज दाखल होणाऱ्या नागरिकांना दररोज सकाळी चहा, नाष्टा, दुपारचे व संध्याकाळचे जेवण पुरविणे इ. कामे करणे कामी जाहिर निविदा न मागविता मे.अरहन्ती २४ एंटरप्रायझेस या एजन्सीकडून दि.८/५/२०२० पासून काम करुन घेणेस व सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये खालील बाबी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.१/२०३ दि.४/८/२०२० चे पत्र.

१) ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत विविध ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमुद केलेल्या आयसोलेशन सेंटरमध्ये दैनंदिन दाखल होणाऱ्या नागरिकांना तसेच अवेटेड,निगेटिव्ह, पॉझिटिव्ह व कोरंन्टाईन साठी दाखल होणाऱ्या नागरिकांना दैनंदिन सकाळी चहा, नाष्टा, दुपारचा चहा याची प्रती प्लेटची र.रु. ६०/- मे.अरहन्ती २४ एंटरप्रायझेस, स.नं. १६४/१बी, फ्लॅट नं. २०१, लिली अपार्टमेंट, लेन नं. १० आदर्श कॉलनी विद्यानगर, टिंगरेनगर, पुणे यांना र.रु. ६०/- प्रतिदिन प्रती व्यक्ती (जीएसटी अन्य करांसहीत) यांनुसार देणेस तसेच झालेल्या कामाचे दि.८/५/२०२० पासून दि.२/६/२०२० अखेर पर्यंतचे दिलेले बिल मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेले असून ते बरोबर आहे तरी सदर बिलामध्ये नमुद केलेली र.रु. ८,१९,८४०/- मे.अरहन्ती २४ एंटरप्रायझेस यांच्या नावे धनादेशाद्वारे खालील अर्थशिर्षकांमधून अदा करणेस

अर्थशिर्षक महसुली कामांसाठी - कोविड १९ अंतर्गत अत्यावश्यक महसुली कामाच्या खर्चासाठी मदत बजेट कोड RE17F 257

भांडवली कामांसाठी - कोविड १९ अंतर्गत अत्यावश्यक भांडवली कामाच्या खर्चासाठी मदत बजेट कोड CE17A242/j6-30

२) वरील अ.क्र. १ चे अंमलबजावणी महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) नुसार दि.८/५/२०२० पासून ते दि.२/६/२०२० अखेर पर्यंत ढोले पाटील क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत विविध ठिकाणी स्थापन करण्यात आलेल्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात नमुद आयसोलेशन सेंटरमध्ये दैनंदिन दाखल होणाऱ्या नागरिकांना तसेच अवेटेड,निगेटिव्ह, पॉझिटिव्ह पेशंटसाठी दाखल होणाऱ्या नागरिकांना दैनंदिन सकाळी चहा, नाष्टा, दुपारचा चहा याची प्रती प्लेटची र.रु. ६०/- मे.अरहन्ती २४ एंटरप्रायझेस यांनी पुरविलेबाबत व त्यांना रक्कम अदा करणेस

**विषय क्र. ३८४**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतूदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणू प्रतिबंधक उपाययोजने अंतर्गत उद्‌भवलेल्या आपत्कालिन परिस्थितीमध्ये पुणे मनपा लागण झालेल्या रुग्णांना व संशयीत रुग्णांच्या विविध ठिकाणच्या क्वारंटाईन कक्षामध्ये तसेच प्रतिबंधित क्षेत्रामध्ये सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविणेसाठी मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्यामधील अ.क्र. १ ते ४ या झालेल्या कामांची मे.आय सिक्युअर पॉवर टेक्नॉलॉजीस इंडिया प्रा.लि. यांनी र.रु. ३९,९०,३७३=२६ पर्यंत केलेल्या कामांची देयक अदा करणेस व त्यानुसार आवश्यकतेनुसार करारनामा करणेस मान्यता देण्यात आलेली असून सदरची बाब मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/२०४ दि.४/८/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ३८५**

कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत पुणे महानगरपालिकेचे Covid care center (CCC) येथील कामकाजाकरिता एकवट वेतनावर, ९० दिवस कालावधीसाठी, तात्पुरत्या स्वरुपात "डाटा एन्ट्री ऑपरेटर" नियुक्त करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्र/२०५ दि.४/८/२०२० चे पत्र.

सुनिल पारखी
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

सुचना – कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअॅप द्वारे कळविण्यात येईल.